:: पाहिजेत ::

उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/(११/१५)/मशि-१, दिनांक २८ जानेवारी, २०१९ व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ११/ई-९३९०२९/मशि-१, दिनांक १२ मार्च, २०२५ या शासन निर्णयास अनुसरुन उच्च शिक्षण संचालनालय, पुणे मुख्यालय तसेच विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर या कार्यालयामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे **एकूण ०३ कंत्राटी विधी अधिकारी** रक्कम **रुपये ५०,०००/-** (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) **ठोक मासिक मानधना**वर भरण्यात येणार आहेत.

यासाठी खालील अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या विहित अर्जासोबत सर्व कागदपत्रे एकत्रित पीडीएफ करुन **दि. ३० मे, २०२५ पर्यंत** director.dhepune@nic.in या ईमेलवर सादर करावीत. अर्जांच्या पडताळणीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक, वेळ व ठिकाण स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

| | |
|---|---|
| १ | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल. |
| २ | विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. |
| ३ | उमेदवार सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादीबाबत ज्ञानसंपन्न असेल, ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल. |
| ४ | उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल, |
| ५ | विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ३५ वर्षापेक्षा जास्त नसेल. |

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

| | |
|---|---|
| १ | सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे |
| २ | परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करणे / सेवाविषयक / प्रशासकीय / विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे, |
| ३ | प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे / सादरकर्ता अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करणे. |
| ४ | शासन प्रतिवादी आहे, अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबधित अधिकाऱ्यांचे मदतीने तयार करणे. |
| ५ | शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन, न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल याची दक्षता घेणे. |
| ६ | जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे. |

| | |
|---|---|
| ७ | अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास संबंधित सरकारी वकीलांशी संपर्क साधून अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे, तसेच विहित मुदतीत अपील दाखल करुन न्यायनिर्णयास स्थगिती मिळविण्यासाठी पाठपुरावा करणे. |
| ८ | नेमूण दिलेल्या संबंधित विभागातील सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी नोडल अधिकारी म्हणून काम पहाणे. |
| ९ | विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे |
| १० | निकाली निघालेल्या प्रकरणांबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार कोणती कार्यवाही करणे अपेक्षित आहे, याबाबत अवगत करुन क्षेत्रीयस्तर, संचालनालयस्तर व शासनस्तरावर पाठपुरावा करणे. |
| ११ | विधी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेल्या विभागातील न्यायालयीन प्रकरणाचा मासिक आढावा / अहवाल त्यांनी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत उच्च व तंत्रशिक्षण विभागास सादर करणे. |
| १२ | उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सह / उपसचिव (विधी) यांच्या संपर्कात राहून आवश्यक तेथे त्यांचे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करणे. |

**विधी अधिकारी या पदावरील नियुक्ती ही खालील अटींच्या अधीन राहील.**

| | |
|---|---|
| १ | सदर पदावरील नेमणूक ही पूर्णत: तात्पुरती असेल, सदरहू विधी अधिकारी शासकीय अधिकारी म्हणून गणले जाणार नाहीत. तसेच त्यांना सेवासातत्य मिळण्याबाबत कोणतेही हक्क राहणार नाही. त्यांची नियुक्ती दिनांक २८ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील विनिर्दिष्ट करारनाम्याच्या अधीन राहील. |
| २ | सदर नेमणूका करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यांनंतर आवश्यकतेनुसार शासनाच्या पूर्वपरवानगीने मुदतवाढ तथा पुन:श्च नियुक्तीबाबत विहित कार्यपध्दतीनुसार निर्णय घेण्यात येईल. तसेच नियुक्त विधी अधिकाऱ्यांच्या सेवा विहित कार्यपध्दती अनुसरुन कोणत्याही टप्प्यावर समाप्त करण्याचे अधिकारी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहतील. |
| ३ | नेमणूक करण्यात येणाऱ्या विधी अधिकाऱ्यांना ठोक मासिक मानधनाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत. |

सही/-

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६

# कंत्राटी विधी अधिकारी पदासाठी अर्ज

| कार्यालयीन उपयोगासाठी | अर्ज आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|
| | | |

फोटो

१. उमेदवाराचे नाव :-

| मराठी | आडनाव | नाव | वडील / पतीचे नाव |
|---|---|---|---|
| | | | |
| इंग्रजीत | Surname | Name | Father / Husband Name |
| | | | |

२. जन्मदिनांक :- / /

३. दि. १ जून २०२५ रोजी वय :- __ __वर्षे ___ महिने

४. शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | पदवी / पदविका | उत्तीर्ण वर्ष | विद्यापीठ / बोर्ड |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

५. अनुभव :-

| अ.क्र. | कालावधी | अनुभव तपशील |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |

६. पत्र व्यवहाराचा पत्ता :

-----------------------------------------------------------------------------------------

७. मोबाईल क्रमांक

| | ईमेल | |
|---|---|---|

मी ______________________________ खालील सही करणार लिहून देत आहे की, सदरील कंत्राटी विधी अधिकारी या पदाची जाहिरात, अटी व शर्ती मी पूर्णपणे वाचल्या असून मला मान्य आहेत. तसेच सदरील अर्जात दिलेली माहिती पूर्णपणे सत्य असून त्या पृष्ठर्थ आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडण्यात येत आहेत. वरी दिलेली माहिती खोटी / असत्य आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर माझा अर्ज / नियुक्ती रद्द झाल्यास माझी हरकत राहणार नाही.

ठिकाण :- उमेदवाराची सही :

दिनांक :- उमेदवाराचे संपूर्ण नाव :